# प्रकरण चौथे

## सामाजिक सुधारणा चळवळ

# प्रकरण चौथे

## सामाजिक सुधारणा चळवळ --

भारत हा खंडप्राय देश असून तेथे अनेक जाती-धर्माचे लोक राहातात. भारतीय समाज जीवनावर जुन्या चालीरिती, परंपरा, रुढी यांचा फार प्रभाव असल्याचे आढळून येते. ब्रिटिशांचे आगमन होईपर्यन्त भारतीय समाजावर बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, माणसामाणसातील कृत्रीम उच्चनिच भाव इत्यादी अनिष्ट चालीरितींचा विलक्षण पगडा होता. बहुजन समाज अडाणी आसून खेड्यापाड्यात विखुरलेला होता. समाज धुरीणांनी स्त्रीयांच्या शिक्षणावर बंधी घातली होती. समाजातील मूठभर सुशिक्षित लोक अडाणी जनतेची पिळवणूक करीत होते. विषम समाज व्यवस्थेत भरडून निघणाऱ्या सामान्य जनतेला आपल्या हक्कांची जाणिव नव्हती. अज्ञान, विषमता, दारिद्र्य व पिळवणूक इत्यादी प्रकाराने आडाणी जनता त्रस्त झाली होती. समाजातील पुढाऱ्यातील वर्गांनी जनतेच्या अज्ञानाचा गैर-फायदा घेऊन स्वत:च्या स्वार्थासाठी कालबाह्य झालेल्या जाती व्यवस्थेला खतपाणी घातले, त्यामुळे माणसाची जात त्याच्या गुण कर्मावरुन न ठरता जन्मावरुन ठरविली जाऊ लागली. समाजात अस्पृश्यतेचे फारच स्तोम माजले. अस्पृश्य समजलेल्या दलित जनतेला वर्षानुवर्षे जुलूम अत्याचारांना तोंड द्यावे लागले.

मात्र इंग्रजांचे भारतात आगमन झाल्यावर येथील समाज जीवनात महत्वाचे बदल होऊ लागले. इंग्रज राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहानाने पाश्चात्य, उदार शिक्षणाचा समाजात प्रसार होऊ लागला. सामान्य जनतेला शिक्षण घेण्याची संधी मिळू लागली. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या पुरोगामी विचारांच्या भारतीय

तरुणांना समाज सुधारणांची निकड भासू लागली.त्यांनी समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी कांही संघटना स्थापन केल्या आणि चळवळी संघटीत केल्या. समाज सुधारणांच्या क्षेत्रात महाराष्ट्र सतत अग्रेसर होता. समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी अनुकूल लोकमत बनविण्याच्या कामी मराठी वृत्तपत्रांनी मोलाची कामगिरी बजावली. म.जोतिराव फुले,राजर्षि शाहू छत्रपतीमहाराज,म.वि.रा. शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,कर्मवीर भाऊराव पाटील,इत्यादी समाज सुधारकांच्या पुढाकारांनी दक्षिण महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांच्या चळवळीस उधाण आले होते. समाज सुधारणाचे विचार सामान्य जनतेत फैलावून समाज सुधारणेला हातभार लावण्याच्या कामी `पुढारी` ने महत्वपूर्ण कामगिरी बजाविली.

पुढारी मधल्या दि.२२ मार्च १९५३ च्या अग्रलेखात सामाजिक सुधारणेबाबत आपले मत वर्तविले आहे. भारतात पिढयान-पिढयाचे जातिभेद,उच्च-नीचतेची भावना आणि पुढारलेल्या वर्गाचा स्वार्थ यामुळे सामाजिक,आर्थिक व राजकीय विषमता पराकोटिस जाणे अपरिहार्य होते. महाराष्ट्राच्यादृष्टीने विचार केल्यास, ऐतिहासिक काळातील संताची कामगिरी सोडली तरी, ब्रिटिश अमदानीपासून समाज सुधारकांची कोणत्याही समाज अभिमानास्पद वाटले अशी मालिकाच निर्माण झाली.म.फुले,लोकहितवादी न्या.रानडे,प्रि.आगरकर,महर्षि वि.रा. शिंदे, राजर्षि शाहूमहाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महर्षि कर्वे, या समाज सुधारकांनी आपला समाज सुधारण्यासाठी महान कार्य केलेले आहे. अलिकडच्या काळात सर्व लक्ष राजकारणावर व सत्तासंपादनावर लागल्याने समाजावर होणाऱ्या अन्यायाकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही, त्यामुळे विषमता समाजामध्ये वाढत गेली. याचा परिणाम म्हणूनच की काय हिंदुकोड बिल,वारसा हक्क,घटस्फोट या सारख्या सामाजिक महत्वाच्या प्रश्नावरही अनास्था दिसून येते. महाराष्ट्र भाऊबंदकीबद्दल प्रसिध्द आहे. आणि त्यातच जातिभेदामुळे निर्माण झालेल्या विषमतेने त्यांचे नुकसान होत आहे. या विषयीचे चित्र आपणास महाराष्ट्रात दिसून येऊ लागले आहे.३० जानेवारी १९४८ साली महात्मा गांधीजीचा खून

झाला.या प्रकारामुळे महाराष्ट्रातील काही विचारवंताचे डोळे उघडले. या समाजातील विषमता नाहीसी करण्याच्या उद्देशाने जातिनिर्मूलन संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेचा समाज सुधारण्यासाठी उपयोग झाला. या संस्थेच्या वतीने पुणे येथे महाराष्ट्र सामाजिक परिषदेचे अधिवेशन दि.१८,१९ व २० एप्रिल १९५३ रोजी मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश व सामाजिक सुधारणाची पुरस्कर्ते न्या.प्र.बा.गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक परिषद भरविण्यात येणार होती. या परिषदेस महाराष्ट्रातील सर्व वर्गातील व पक्षातील थोर मंडळींचा समावेश होता. पुण्याचे सुप्रसिध्द शिक्षणतज्ञ व समाजसेवक श्री.बाबूराव जगताप यांनी स्वागताध्यक्षा पद स्वीकारलेले होते. संस्थेच्या या पत्रकात असे म्हटले आहे की, हरिजन,स्त्रिया,मागासलेले वर्ग, आदिवासी,बहुजनसमाज हे सर्व जन्माने वा इतर आनुषंगिक कारणांनी प्राप्त झालेल्या अनेक प्रकारच्या सामाजिक अपात्रतेतून मुक्त होण्यासाठी व संपूर्ण सामाजिक समता प्रस्थापित होण्याची वाट पहात आहेत. केवळ कायदे प्रणित समतेने त्याचे समाधान होणे शक्य नाही.प्रत्यक्षा व्यवहारात समता उतरली पाहिजे.विशेषत: समाजाने कसे वागावे या गोष्टीबाबत अधिकृत मार्गदर्शन व्हावयास पाहिजे व म्हणून सामाजिक परिषद पुन: पूर्वी प्रमाणे भरविण्याची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली. सामाजिक सुधारणाही देशास आज क्रांती इतकीच निगडीत आहे अशा प्रकारे सामाजिक परिषद बद्दलचे आपले विचार 'पुढारी' कारांनी मांडलेले आहेत.[१]

मंदिर प्रवेश --

महाराष्ट्रामध्ये अनेक जाति धर्माचे,वंशाचे लोक राहात होते या समाजामध्ये मोठया प्रमाणात विषमता होती.स्पृश्य लोक अस्पृश्यांना वाईट वागणूक देत होते. त्यांच्यावर अन्याय,अत्याचार केला जात होता.त्यांना कोणतेही हक्क मिळत नव्हते.पशु प्रमाणे वागविले जात होते.असाच एक प्रश्न मंदिर प्रवेश अस्पृश्यांच्या जिव्हाळ्याचा होता.त्यासाठी समाज सुधारकांनी 'मंदिर प्रवेश' या विषयासंबंधी लढा करुन त्यांना कायद्याने हक्क मिळवून दिला. त्यामुळे 'पुढारी' कारांचा सिंहाचा वाटा आहे.

विठ्ठल मंदिर - प्रवेशाचा प्रश्न --

हिंदुस्थानात लोकनियुक्त मंत्रिमंडळे स्थापन झाले होते. त्यावेळीपासून अस्पृश्यता नाहीशी करण्याच्यादृष्टीने सर्वत्र मोठी आंदोलने सुरु करण्यात आली आहेत. महाराष्ट्राचे गुरुजी, विद्यार्थी-विद्यार्थिनींचे पुढारी, थोर साहित्यिक श्री.साने गुरुजी अमरण उपोषणाला बसले होते. कारण महाराष्ट्राचे अद्य दैवत पंढरपूरचे विठ्ठल मंदिरात सर्व समाजांना प्रवेश नव्हता. अस्पृश्यांना दर्शन घेण्यास मनाई होती. त्या मंदिरात सनातनी वृत्तीच्या लोकांची सत्ता होती हे मंदिर हरिजनांना खुले करावे त्यामुळे सनातनी लोकांचे मंदिरातील वर्चस्व आपोआप कमी होईल श्री.साने गुरुजी उपोषणाला बसले असताना त्यांच्या कडून सहा महिन्याची मुदत घेण्यात आली व उपोषण स्थगित करण्यास सांगितले होते. सर्व महाराष्ट्रीयांनी जर विठ्ठल मंदिर उघडण्यासाठी आकाश-पाताळ एक केले तर श्री.साने गुरुजींचा उपवास व महाराष्ट्राचे प्रतिगामित्व सिध्द होणार आहे. हरिजनांना हिंदूधर्मात समानतेने वागविण्याची महाराष्ट्राची तयारी असेल तर वेळ न घालविता पंढरपूरचे मंदिर हरिजनांना खुले करावे कोल्हापूरच्या सर्व जातिधर्माच्या नागरिकांनी वरील कार्यासाठी सिध्द रहावे. ठिकठिकाणी सभा घ्याव्यात, संस्थांच्यातर्फे ठराव पास करणे, पत्रकांवर जास्तीत जास्त सह्या गोळा कराव्यात, यामुळे श्री. विठ्ठल मंदिरांची हरिजनांना बंद असलेली दारे उघडी राहातील. महाराष्ट्रातील सवर्ण हिंदुची हृदये उघडली जातील आणि हिंदु धर्मावरील कलंक अस्पृश्यता धुवून टाकण्याला फार मोठे सहाय्य होईल. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे पत्रक करवीर इलाखा हरिजन संघाच्या अध्यक्षा सौ. - उर्मिला सबनीस व संघाचे चिटणीस श्री.रा.ल.महाबळ यांनी काढले.[२]

मंदिर प्रवेशाचा कायदा --

'पुढारी' ने दि.२८ एप्रिल १९४७ च्या आपल्या अग्रलेखात या बिलाच्या मर्यादा स्पष्ट करुन त्यावर परखड भाष्य केले आहे. मुंबई सरकारने एक बिल विधिमंडळाकडे मांडून ते सिलेक्ट कमिटीकडे पाठविले आहे. या बिलामुळे हरिजनांना

देवदर्शनाचा हक्क प्राप्त होणार आहे यासाठी सनद, करारनामा, कोर्टाची डिक्री, रूढी, परंपरा, विश्वस्तनिर्बन्ध या पैकी कोणात्याही कारणाखाली प्रतिबंध करता येणार नाही. प्रतिबंध केल्यास ६ महिने पर्यन्त कैद किवा दंड अगर कैद अशी शिक्षा ठेवली आहे. हा प्रवेश मर्यादित आहे. मंदिर प्रवेशाचे कलम, असे आहे की ज्या देवाल्यात दर्शनासाठी वा पुजेसाठी सर्व सामान्य हिंदुना ज्या प्रमाणात प्रवेश मिळतो त्या देवाल्यात, त्याच प्रमाणात हरिजनांनाही या पुढे दर्शनासाठी वा पुजेसाठी प्रवेश मिळेल. देवालयाच्या आवारांत किंवा बाहेर आसलेल्या तळ्यांतील पाण्यात आंघोळ करण्याचा किवा ते पाणी वापरण्याचा सर्व सामान्य हिंदुना जर अधिकार असेल तर हरिजनांनाही त्या तळ्यांतील पाण्यात आंघोळ करण्याचा किवा ते पाणी वापरण्याचा अधिकार मिळाला पाहिजे हे सर्वांना कलम लागू आहे. स्पृश्य हिंदुना देवालयात जावून ज्या मर्यादेपासून दर्शन घेता येते तेथपर्यन्त हरिजनांनाही जाता येईल. देवाचे पादस्पर्शपूर्वक दर्शन घेण्यास दोघांनाही प्रतिबंध आहे. अस्पृश्यता ही उच्चनीचतेच्या भावनेपोटी जन्माला आलेली आहे. आणि ती भावना या मंदिर प्रवेश बिलाने नष्ट होईल, ही समजूत चुकीची आहे. या बिलाने हरिजनांची अस्पृश्यता ७५ टक्के कमी करुन २५ टक्के मात्र कायम राखण्यात आली आहे.[3]

नृसिंहवाडीत हरिजन मंदिर प्रवेश --

म. गांधीच्या पहिल्या पुण्यतिथिनिमित्त अस्पृश्योध्दार कार्याची अंशत: अंमलबजावणी करावी म्हणून कोल्हापूरचे प्रशासक कॅ. व्ही. नजप्पा यांनी स्वत: पुढाकार घेऊन हरिजन मंदिर प्रवेशाचा उपक्रम सुरु केला. दि. २३-१-१९४९ रोजी त्यांनी हरिजन बांधवा समवेत देवाल्याबाहेर लोखंडी कठड्यापर्यन्त देव दर्शन घेतले व श्री दत्ताची महापूजा केली. या हरिजन मंदिर प्रवेशास नृसिंहवाडी येथील ब्राह्मण पुजाऱ्यांनी आनंदाने समती दिली. या संदर्भातील करवीर सरकारच्या पत्रकात असे म्हटले आहे की, सर्व जातिधर्माच्या हिंदूना सदर देवालय खुले आहे. मात्र सदर देवाल्याच्या बाहेरील लोखंडी गजाच्या कुंडयापुढे कोणीही स्पृश्य अगर हरिजन यांने न जाता कठड्या बाहेर राहून देवदर्शन

SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR

घ्यावयाचं आहे फक्त देवाचे वर्णीलदार पुजारी व त्याचे शागीर्द आश्रित यांनी तेवढे सदर कठड्याचे आंत जाऊन पूजाअर्चा,आरती वगैरे करण्याचे आहे. इतरांनी,ब्राह्मणांनी सुध्दा आंत जाण्याचे नाही' असे पत्रक होते. सदर दरबाराच्या या हुकूमावर अग्रलेखात' पुढारी' ने आपले स्पष्ट मत नोंदले आहे. हुकूमाने पूर्वपरिस्थितित कोणता बदल झाला असेल तर तो फक्त देवदर्शनाकरिता जेथवर ब्राह्मणेत्तर जाऊ शकतात तेथवर अस्पृश्यांना इत:पर जाता येईल इतकाच .आजवर ब्राह्मणांना गाभाऱ्यात जाण्यास प्रतिबंध नसला तरी ते देखील सर्रास जात नसतात. नवीन हुकूमाने ब्राह्मणांचा हा हक्क हिरावल्यासारखा वाटत असला तरी पूजाऱ्यांचे आश्रित म्हणून त्यांना तो या पुढेही बजावता येईल.देवालयाच्या गाभाऱ्यातील पावित्र्य,स्वच्छता टिकविण्याकरता कांही निर्बन्ध आवश्यक आहेत. एखाद्या हरिजनाला श्री दत्ताचे पदस्पर्शपूर्वक दर्शन घेऊन हा नियम सर्वांकरिता जारी केला असता, तर समानतेचा हक्क प्रस्थापित झाल्याचा आनंद हरिजनांना उपभोगताआला असता. ब्राह्मणेत्तरांना किंवा हरिजनांना देवाचे पदस्पर्शपूर्वक दर्शन यापूर्वी झाले नव्हते.या हुकूमाने होणार नाही. कैं.नंजाप्पा यांच्या लक्षात ही गोष्ट आली नसावी म्हणून त्यांना अशी विनंती आहे की,म.गांधीच्या कार्याची पूर्तता करुन त्यांच्या पवित्र आत्म्याला समाधान लाभू द्यावयाचे असेल तर प्रत्येक देवाचे हरिजनांस निदान एकदा तरी पदस्पर्शपूर्वक दर्शन घेऊ द्यावे आणि नंतर गाभाऱ्यांतील पावित्र्य राखण्याकरिता सर्वांनीच विशिष्ट मर्यादेपुढे जाऊ नये असे निर्बन्ध घालावे.[४]

' पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहात ब्राह्मणेत्तरांनी केवळ पाठिंब्याची पत्रके न काढता अस्पृश्यांच्या बाजूने प्रत्यक्ष भाग घ्यावा असा आग्रह धरला होता. जवळकरांनी त्या सत्याग्रहात भाग घेतला होता. पुढारी ने संस्थानी कार्यांना पाठिंबा दिला. त्यांनी अस्पृश्यांची बाजू घेतली.अस्पृश्यता निवारण करण्याचा मनोदय केला. आपल्या पुढारी मधून या चळवळीला उत्तेजन दिले. अस्पृश्यता निवारण्यामध्ये फार मोठी मोलाची कामगिरी केली आहे.[५]

मंदिर प्रवेश व जैन समाज --

पुढारीमधील दि.१४ ऑगस्ट १९४९ च्या अग्रलेखात मंदिर प्रवेश जैन समाज याविषयी मत वर्तविले आहे. सरकारच्या मंदिर प्रवेश कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता सांगली येथे हरिजनांनी कॉंग्रेस पुढाऱ्यासमवेत जैन मंदिरात जाऊन देवदर्शन घेतले पण दुसऱ्या जैनमंदिरास हरिजनांनी आंत प्रवेश करु नये म्हणून कुलूप लावले होते.जैना शिवाय इतर शीख,ब्राह्मणानी विरोध केला नव्हता. सनातनी जैन पक्षाचे म्हणणे असे की, हरिजनांच्या मंदिर प्रवेशास आपला जो विरोध आहे ते परधर्मीय आहेत म्हणून ते जर जैन धार्मिक म्हणून जैन मंदिरात प्रवेश करतील तर त्यास आमची कांही हरकत नाही. जैन अस्पृश्यता मानतात की नाही हाच खरा प्रश्न आहे. अस्पृश्यता मान्य नसेल तर हरिजनांना मंदिर प्रवेश करु न देण्यास हरकत करण्याचे काही कारण नाही.धर्मप्रचाराच्यादृष्टीने कोणत्याही मंदिरात हरिजनांनाच काय पण परधर्मीयांचेही आपण स्वागत केले पाहिजे.ज्याला जी धर्मतत्वे आवडतील ती त्यांनी खुशाल स्वीकारावीत व कोणत्याही देवाची अगर देवतेची उपासना करावी.या संकुचीत धोरणामुळेच परधर्मीयांची संख्या वाढली.निदान यापुढे तरी सर्वांनी समता व बन्धूत्व आचरणात आणावे.[६]

पुढारी ने अस्पृश्यतेविरुध्द सतत आवाज उठविला. म.फुले,महर्षि वि. रा.शिंदे व छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्योध्दाराला आपले जीवनच वाहिले होते. त्यांच्या पावलावर पाऊ ठेवून पुढारी ने अस्पृश्यतेविरुध्द लोकमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हा म्हणे अस्पृश्योध्दार या लेखात त्यांनी भोर संस्थानिकाला धारेवर धरले.त्या संस्थानच्या तकलादु समाज सुधारणेचे पितळ उघडे केले. ओले घातले रडाया अशा त्यांच्या मनोवृत्तीवर उपहासाचे कोरडे ओढले. अस्पृश्यता गेलीच पाहिजे या लेखात महात्माजींचे अस्पृश्योध्दाराचे कार्य कसे थोर आहे. गांधीजीं विषयी लोकांत असलेला गैरसमज दूर केला. डॉ.आंबेडकरांचा गैरसमज झाला पण वस्तुस्थिती वेगळी होती असेस्पष्ट मत

मांडले आहे. समाजात आता जातीनिष्ठ प्रवृत्ती राहिल्या नसून वर्गकलह सुरु झाला असल्याचे त्यांचे निदान १०० टक्के सत्य आहे ही त्यांची मिमांसा मुलगामी स्वरुपाची व डोळस परीक्षाणानंतर केली आहे.[७]

मंदिर व्यवस्थामधील सुधारणा --

पुढारी मधील दि.४ नोव्हेंबर १९६८ च्या अग्रलेखात खालील मत वर्तविले आहे. पंढरपूरच्या विठ्ठल देवस्थानच्या व्यवस्थेसंबंधी चौकशी करण्यासाठी सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री.नाडकर्णी यांची चौकशी समिती नेमली. या समितीचे चौकशीचे क्षेत्र व्यापक ठेवण्यात आले असून सेवेकरी, बडवे, उपाध्याय,आदी भक्त जनांना व यात्रेकरुंना लुबाडण्यावरच सारे लक्ष असते. मंदिर भक्ताकडून जमा होणारा पैसा कशा प्रकारे सध्या कोणाकोणाच्या हाती जातो,त्यातील मंदिराची व्यवस्था वा इतर व्यापक धार्मिक बाबींना किती खर्च याचीही चौकशी करुन भविष्यात हा पैसा धर्म व समाज याचे ख-या अर्थाने धारणा करण्यासाठी कशा प्रकारे खर्च पडावा हेही समितीने सुचविले आहे.

महाराष्ट्रात पंढरपूर सारखी तुळजापूर,नाशिक त्र्यंबकेश्वर,परळी वैजनाथ,औंढया नागनाथ ही तर अखिल भारतीय तीर्थस्थाने आहेत. त्याच बरोबर निरनिराळ्या काळच्या राजामहाराजांनी निर्मिलेली अनेक देवळे आहेत. कायदेशिररित्या ही देवळे त्या त्या राजांच्या किवा राज्यांच्या मालकीची होती. सरकारने संस्थाने विलीन केली,तेथे आता या उपाध्येपुजा-यादी मंडळींना हक्क नाहीत.मंदिर हे सर्वच हिंदूचे धार्मिक व अध्यात्मिक उपासनेचे ठिकाण आहे. काही मंदिरचालकांनी देवळाचे बाजारही बनविले आहेत. महाराष्ट्र सरकारने पंढरपूर नव्हे तर राज्यातील सर्व देवालयांच्या व्यवस्थेसाठी शीख धर्मियांच्या, 'शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक समिती' व 'स्थानिक प्रबंध समिती' या धर्तीवर संपूर्ण राज्यभर एक सूत्र नियमावली तयार करावी. नगरपालिका,व जिल्हा परिषदा या लोकनियुक्त संस्थानाही या मंदिर व्यवस्थेत जरुर सहभागी केले जावे.

तसेच मंदिरात जमा होणारा पैसा हा त्या मंदिराची डागडुजी, सौन्दर्यात भर, यात्रेकरूंची सोय यासाठी तर खर्च व्हावाच, त्या शिवाय गिरीच्या व्यंकटेश उर्फ बालाजी देवस्थानच्या उत्पन्नातून ज्याप्रमाणे अन्नमलाई विद्यापीठ चालविले जाते, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील देवस्थानचा हा जादा पैसा समाजाच्या उन्नतीसाठी, शैक्षणिक कार्यासाठी खर्च व्हावा. या मंदिर व्यवस्थापन समित्यावर हरिजनांनाही स्थान दिले जावे. यामुळे अस्पृश्यता निवारण कार्यास चालना मिळेल. महाराष्ट्र ही समाज सुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या संतमहात्म्यांची, म.जोतिबा फुले, आणि राजर्षि शाहू महाराजांची भूमी आहे. शासनाने खंबीर भूमिका घ्यावी. ' धर्मो धारयते प्रजा ' असे म्हटले जाते ते जर खरे असेल तर धार्मिक उपासनांची स्थळे ही उपासनेची पवित्र स्थळेच ठरली पाहिजेत. त्यासाठी अनिष्ट प्रथा, व्यक्ती व त्याचे हितसंबंध यांचे उच्चाटन करण्याची आज नितांत गरज भासत आहे.[8]

अस्पृश्यता निर्मूलनाचे उपाय --

म.गांधी व अस्पृश्यतेचा प्रश्न या विषयाची पुढारीच्या अग्रलेखात सांगोपांग चर्चा करण्यात आली आहे. म.गांधींना जातिभेदाबाबत एका मित्राने विचारले असता, गांधीजी म्हणतात की ' हिंदुधर्मातील जाति संस्था हा एक काल विपर्यास आहे. आणि खरा धर्म व हिंदूस्थान हे जिवंत राहून त्याची दिवसें-दिवस प्रगती करावयाची असेल तर जातिभेद गेला पाहिजे '. गांधींनी स्वत:च्या वैयक्तिक आचरणात अस्पृश्यतेची बंधने केव्हाच झुगारुन दिली. एका अस्पृश्य कन्येचे पितृपण त्यांनी स्वत: करुन तिचा विवाह एका सुवर्ण तरुणाशी लावून दिला. श्री.आप्पासाहेब पटवर्धनांसारखे अभिजात गांधीवादी अस्पृश्यता निवारणाचा हाच आत्यंतिक अर्थ लावून काम करित आहेत. गांधीवादाची झूल पांघरुन काही ढोंगी लोकांनी अस्पृश्यता निवारण्याचा उपयोग स्वत:च्या हरिजनसेवेची जाहिरात-बाजी केल्यामुळे गांधीजींच्या मूळच्या हेतू बद्दल थोडा फार गैर समज पसरला होता. व त्याचाच परिणाम होऊन डॉ.आंबेडकर व त्यांच्या अनुयायांचा गांधीजींच्या

ताज्या घोषणे मुळे हा गैरसमज दूर होईल. गांधीजी हे समाज रचनेचे ध्येय गाठण्याचा प्रयत्न करीत होते.पण त्या बाबतीत त्यांचे विशिष्ट असे तंत्र आहे. या बाबतीत लेनिन याने 'खरा पुढारी तोच की जो समाजाच्या पुढे बेफाटपणे धावत नाही. किंवा समाजाच्या मागेही राहात नाही, तर समाजाची नाडी ओळखून समाजाला आपल्या बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो.' अशी पुढाऱ्याची व्याख्या केली आहे. तीच कृतीत आणण्याचा गांधीजी प्रयत्न करित असावेत. किसान कामगारांमध्ये अपूर्व जागृती झाल्याचे पाहून त्यानी किसान कामगारांच्या राज्याची घोषणा केली आणि त्यानी जातिभेद नष्ट केले पाहिजेत अशी घोषणा केली आहे. गांधीजीच्या या बाबतीतील पूर्वीच्या लिखाणातून शब्दांचा कीस न काढता ढोंग करुन अस्पृश्यता निवारणाबाबत काही तरी धातुरमातुर करणाऱ्या किंवा अस्पृश्यता निवारण करण्यात आपण जणू काय अस्पृश्यांवर बडे उपकार करीत आहेत अशा थाटात काम करणाऱ्याना या क्षेत्रातून धक्के देवून बाहेर हाकलले पाहिजे. हरिजनोध्दार म्हणजे स्वत:चा उध्दार,हरिजनांचा नव्हे' हीच भूमिका ठेवली गेली तरच सवर्ण व अस्पृश्य यांच्यात पडलेले महदंतर भरुन निघेल.[१]

पुढारी मध्ये दि.३० ऑक्टोबर १९५४ च्या अग्रलेखात हरिजनोध्दार बाबत खालील मत मांडले आहे. अखिल भारतीय शेड्यूल कास्टस् फेडरेशनचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरलेल्या फेडरेशनच्या बैठकीत कार्यकारिणी व सर्व प्रादेशिक समित्या बरखास्त करण्यात आल्याचे जाहिर केले. मुंबई शाखेची बैठक होऊन वरील मागणी विनंती म्हणून करण्यात आली होती. या विनंतीचा आधार घेऊन डॉ.आंबेडकरांनी कार्यकारिणी व प्रादेशिक समित्या विसर्जित केल्या आहेत. डॉ.आंबेडकर फेडरेशनला योग्य ते वळण लावतील अशी आशा ते पहिल्या नेहरू सरकारात मंत्री झाल्यावर वाटू लागली होती पण सार्वत्रिक निवडणुकांचा मौका साधून राजकीय सौदा पटविण्याच्या इर्षेने ते राजीनामा देऊन बाहेर पडले.आणि कॉंग्रेस सरकार यांच्या नावे खडे फोडण्यास पुन: जोराने त्यांनी सुरुवात केली. परंतु निवडणुकीत

फेडरेशनला अपयश आले व ते स्वत: दोनदा पराभूत झाले. सामाजिक,राजकीय व आर्थिक दुरावस्थेतून हरिजन समाजास वर काढणे हेच एक ध्येय व कार्यक्रम फेडरेशनचा असता तर संघटनेच्या या विधायक कार्याच्या आधारावर त्यास मान्यता लोकांत मिळाली असती.हजारों वर्षांच्या अन्याय व दुष्ट रूढींनी जखडलेल्या हरिजन समाजाचा विकास करण्यासाठी होत असलेले प्रयत्न अर्थातच कमी आहेत याची सरकारला जाणीव होती. भारत सरकारच्या कमिशनरच्या अहवालांत त्याची कबुली दिली आहे अशा परिस्थित केवळ स्वत:च्या उन्नतीसाठी झटणाऱ्या हरिजनांनी कॉंग्रेस मध्ये सामील होऊन अस्पृश्योध्दाराची गति वाढविणे किंवा निश्चित ध्येयवाद व कार्यक्रम असणाऱ्या दुसऱ्या राजकीय पक्षात जाऊन जागृतीचा व प्रचाराचा मार्ग स्वीकारणे असे दोनच मार्ग त्यांच्यापुढे उरतात.[१०]

पुढारी मधील दि.६ जून १९५७ च्या अग्रलेखात नवबौध्दांच्या सवलतीबाबत खालील मत प्रकट केले.कै.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने हरिजनांनी बौध्द धर्म स्वीकारला.हरिजन म्हणून शिक्षण,नोकऱ्या वगैरे बाबतीत ज्या सवलती मिळत होत्या त्या मिळतील की नाही अशी शंका निर्माण झाल्याने शेड्यूल कास्ट फेडरेशनच्या ९ खासदारांच्या शिष्ट मंडळाने पंतप्रधान पं.नेहरू यांची भेट घेतली व होणाऱ्या या अन्यायाची जाणीव करुन दिली. कायदा खात्याचे मत आजमावून नंतर या प्रश्नाचा विचार करण्याचे आश्वासन पं.नेहरूंनी शिष्ट मंडळास दिले.हरिजनांना हिंदुधर्मात व समाजात चांगली वागणूक मिळत नाही म्हणून त्यांना या धर्माबद्दल तिटकार वाटावा हे स्वाभाविक आहे. अस्पृश्यता नष्ट व्हावी व शैक्षणिक ,सामाजिक आणि आर्थिक परिस्थिति सुधारुन स्पृश्या-प्रमाणेच त्यांनाही वागणूक मिळावी म्हणून अस्पृश्य पुढाऱ्याप्रमाणे म.फुले राजर्षि शाहू महाराज,म.गांधी या स्पृश्य पुढाऱ्यांनी देखिल मोठे आंदोलन केले व सरकारही त्यांच्या मदतीकरिता पुढे आले. हरिजनांना हिंदू धर्मापेक्षा बौध्द धर्म अधिक चांगला वाटत असेल तर त्यांनी तो स्वीकारावा,पण त्यामुळे त्यांच्या सामाजिक परिस्थितीत कोणता बदल घडणार हे समजत नाही.अस्पृश्यतेसंबंधी

त्यांची स्वत:ची बनलेली भावना काढून टाकणे आणि त्यांच्यातील जातिभेद नष्ट करणे हा हेतू धर्मान्तराने साध्य होत असेल तर ते पुढारीच्या मते स्वागतही आहे. नवबोध्द झाले तरी ते काही दुसऱ्या देशातून येथे आलेले नाहीत. ते भारतीय आहेत व इतर नागरिकांप्रमाणे त्यांनाही हक्क आहे. मागासलेले म्हणून त्यांना आज ज्या सवलती मिळत आहेत त्या त्यांची परिस्थिती सुधारेपर्यन्त सरकार चालू ठेवतील.[११]

शैक्षणिक सुधारणा --

भारत देशाचा लोक संख्येच्या मानाने जगात दुसरा क्रमांक लागतो.या भारत देशाला खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. जगाशी तुलना केली असता भारत देश मागासलेला म्हणून ओळखला जातो. शिक्षणाशिवाय देशाचा विकास होत नाही.शिक्षण मिळाल्यानंतर जनता शहाणी बनती.त्यांच्या हक्कांची जाणीव होती. सर्वांना मोफत शिक्षण मिळण्यासाठी महाराष्ट्र सरकारने कायदा करुन १९४७ ते १९५७ पर्यन्त सक्तीचे शिक्षण केले होते,त्यामुळे आपल्या राज्याचीप्रगती झालेली आपणास पहावयास मिळते. शैक्षणिक स्थिती कशी होती व समाज सुधारकांनी त्यामध्ये कोणता बदल केला आहे,शिक्षणाचे महत्व कशाप्रकारे समजावून दिले,याची माहिती पहाणार आहोत. शिक्षण मिळाले तर समाज सुधारेल,समाज सुधारल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. समाज व शिक्षण यांचे अतुट नाते आहे.शैक्षणिक प्रगतीमुळे जग सुधारलेले पहावयास मिळते.`पुढारी`कार ग.गो.जाधव यांनी शैक्षणिक परिस्थिती व सुधारणा विषयी त्यांनी खालील मत व्यक्त केले आहे.

सार्वत्रिक शिक्षण --

दि.२६ मार्च १९५४ च्या पुढारी तील अग्रलेखात सार्वत्रिक शिक्षणाबाबत खालील मत व्यक्त केले आहे. मुंबई विधान सभेत राज्य सरकारच्या अंदाजपत्रकातील शिक्षण खात्यावरील चौदा कोटी रुपये खर्चाच्या मागणीवर दोन दिवस चर्चा

झाली,होती.राज्यातील सर्व मुलांना १९५७ पर्यन्त सार्वत्रिक सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळु लागेल असे आश्वासन मुंबई सरकारने १९४७ मध्ये दिले.१९५५ सालात म्हणजे ठरल्याप्रमाणे दोन वर्षे अगोदर पूर्ण होत आहे. अशी घोषणा शिक्षण मंत्रीश्री.दिनकरराव देसाई यांनी चर्चेच्या शेवटी केली.मुंबई राज्यात शिक्षणावर सुमारे २० टक्के खर्च केला हे प्रमाण इतर कोणत्याही राज्यापेक्षा जास्तच आहे. पांचशे व अधिक लोकवस्तीच्या प्रत्येक खेड्यात शाळा काढण्याचे सरकारचे धारणानुसार विलीन प्रदेश सोडल्यास इतरत्र अंमलबजावणी होत आहे. पंचवार्षिक योजनेत १९५५-५६ मध्ये प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांचे एकूण ६ ते १४ वर्षे वयाच्या मुलाशी ६६ टक्के प्रमाण होते. कॉलेजातील शिक्षणात १९५५ च्या जून पासून हिन्दी भाषेच्या माध्यमाची सक्ती करण्याचे धोरण सरकारने जाहीर केल्याने त्याच चर्चेत विशेषत्वाने महत्व मिळाले. विरोधी पक्षांनी सरकारच्या या धोरणावर आक्षेप घेतला. १९५५ मध्ये कॉलेजात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाची अडचण भासणार याची जाणीव सरकारला व विद्यापीठाला असली पाहिजे होती,असे मत त्यांनी व्यक्त केले.[१२]

## प्रचलित शिक्षण पध्दती --

दि.८ मे १९५३ मध्ये पुढारी च्या आग्रलेखात प्रचलित शिक्षण पध्दती वर खालील मत व्यक्त केले आहे. मद्रास येथे शिक्षणाधिकाऱ्यांच्या परिषदेचे उद्घाटन करताना म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री.हणुमंतय्या यांनी प्रचलित शिक्षण पध्दतीवर टिका करताना ते म्हणाले सध्याची शिक्षण पध्दती सुधारून घ्यावयाची असेल तर आजच्या विद्यार्थ्यांना नितिशिक्षण व उद्योगधंद्याचे शिक्षण सक्तीने दिले पाहिजे तरच आजच्या पध्दतीतील दोष नाहीसे होतील.परीक्षा घेऊन बेकार करण्याची शिक्षण पध्दती आहे ही शिक्षण पध्दती कारकून बनविण्याचे शिक्षण देते हा दोष नाहीसा करण्यासाठी विद्यार्थ्यांना उद्योग-धंद्याचे शिक्षण द्यावे.शिक्षण पध्दती कुचकामी ठरण्यास शिक्षकांची आर्थिक परिस्थिती कारणीभूत आहे. देशाची मुख्य गरज उत्पादन वाढीची आहे.सरकारने

एक समिती नेमली आहे. ही समिती देशातील वाढत्या बेकारीचा प्रश्न व त्याचा सध्याच्या शिक्षाण पध्दतीशी असलेला संबंध या गोष्टींचा विचार करुन योग्य ती उपाय योजना सुचविल.' पुढारी' कारांच्या मते आजची शिक्षाण पध्दती म्हैसूरच्या मुख्यमंत्र्याच्या म्हणण्याप्रमाणे देशहितावर कधी तरी घाला घालील यात शंका नाही असे मत व्यक्त केले आहे.[१३]

तांत्रिक शिक्षाणाची सोय --

दिनांक १७ एप्रिल १९५९ मधील' पुढारी' च्या अग्रलेखात तांत्रिक शिक्षाणाच्या सोई बाबत खालील मत व्यक्त केले आहे. अ.भा.शिक्षाण मंडळाची १२ वी वार्षिक बैठक दिल्ली येथे झाली. या बैठकीला शास्त्रीय संशोधन आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री.हुमायून कबीर यांनी जे भाषण केले त्यावरुन देशातील तांत्रिक शिक्षाणाची प्रगती कशी होत आहे याची कल्पना येते.नवीन इंजिनिअरिंग महाविद्यालय,तांत्रिक विद्यालय स्थापन झाल्याने विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. १९५६ मध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी २६३२ आणि डिप्लोमासाठी १०२४२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. १९५८ मध्ये पदवीसाठी ११९०० व डिप्लोमासाठी १९५६०,विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला. १९६१ मध्ये पदवी व डिप्लोमासाठी अनुक्रमे १३५०० व २५००० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल अशी अपेक्षा असून १९६६ साली हाच आकडा अनुक्रमे २०,००० व ५०,००० हजार इतका होईल, याचा फायदा समाजाच्या सर्व थरातील विद्यार्थ्यांना कितपत मिळेल हा प्रश्न आहे. समाजाच्या खालच्या थरातील बहुसंख्य वर्ग या शिक्षाणाला पारखा होत आहे. अ.भा.तांत्रिक शिक्षाण मंडळाच्या बैठकीत मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा ठेवण्याच्या प्रश्नावर चर्चा झाली.श्री.चिंतामनराव देशमुख म्हणाले "मागासलेल्या वर्गांना कोणत्यातरी स्वरुपाचे संरक्षाण देणे आवश्यक आहे.हे खरे असले तरी किमान पात्रता विचारात घेतली पाहिजे. पात्रता न पाहता या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर ते कुशल इंजिनिअर होऊ शकणार नाहीत. मागासलेल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के गुण तर इतर विद्यार्थ्यांना ६० टक्के गुणाइतके मागण्यास हरकत नाही,दर वर्षी या प्रमाणात एक टक्याने घट करावी म्हणजे

१० वर्षांनी सर्व विद्यार्थ्यांना सारखे गुण असतील.

पुढारीचा इशारा असा होता की, सवलतीचा फायदा जितका हरिजनांना मिळतो. तितका तो इतर मागासलेल्या वर्गांना मिळत नाही. त्यामुळे या बाबतीतही मोठी विषमता निर्माण होणार आहे. याचा विचार सरकारने वेळीच केला पाहिजे असा इशारा दिला आहे.[१४]

लोक शिक्षणाचे पवित्र कार्य --

लोक शिक्षणाची सरकारची योजना व त्या निमित्ताने पुढारी ने केलेले मत प्रदर्शन दि.६ ऑगस्ट १९४९ च्या अग्रलेखातील खालील प्रमाणे आहे. मुंबई सरकारचे मुख्यप्रधान बाळासाहेब खेर यांनी मुंबई सरकारची प्रौढ शिक्षणाची योजना या विषयावर नभोवाणीवरुन भाषण केले, त्यावरुन या योजनेचे महत्व, व्यापक व उदात्त हेतू याची कल्पना येते. लोकशाहीत प्रत्येक नागरिक हा मतदार म्हणजेच अंशत: राजकर्ता असतो. त्याला हितानहित, राजकारण व देशासंबंधीचे आपले कर्तव्य याबाबत ज्ञान असाले तरच लोकशाही यशस्वी होईल. श्री. बाळासाहेब खेरे म्हणाले की, सध्याच्या सुधारलेल्या जगात नुसत्या साक्षरतेने भागत नाही केवळ लिहिण्यावाचण्यास आले पण बरे आणि वाईट, खरे आणि खोटे, यातला फरक करण्याची बुध्दी निर्माण झाली नाही व चांगले ते करावे आणि वाईट ते टाकावे, अकर्मण्यता आळस घालविणे, विवेकबुध्दी वाढविणे तरच ख-या अर्थाने साक्षर होतील. प्रौढशिक्षणापेक्षाही काही तरी जास्त, काही तरी अधिक भरीव शिक्षण घ्यावे. तर आपल्या देशाची विस्कटलेली घडी झपाट्याने बसविता येईल. तीन वर्षात प्रौढ शिक्षणावरील खर्च ८ लक्ष ३२ हजार रुपयावरुन ८ लक्ष ३५ हजारापर्यन्त वाढला आहे. एवढा खर्च करुन कार्य यशस्वी होण्याची शक्यता कमी आहे. कर्नाटक विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. आर. ए. जहागिरदार यांनी बेळगाव येथे केलेल्या भाषणात म्हणाले विद्यापीठाच्या पदवीधरांनी काही वर्षे समाजसेवा करुन अनुभव घ्यावा असा

निर्बंध घालण्यात येणार आहे असे सांगितले ना.बाळासाहेब खरे म्हणाले की ' लोक शिक्षण म्हणजे साक्षरता नव्हे तर सामाजिक,आर्थिक,राजकीय उन्नतीसाठी जे शिक्षण प्रत्येक नागरिकास मिळणे आवश्यक आहे ते सर्व लोक शिक्षण क्षेत्रात अभिप्रेत आहे' मावी पिढी यापेक्षा अधिक कार्यक्षम व जाणती होईल अशा सर्व शिक्षणाची दारे तिला सहज सुलभ व सतत उघडी असली पाहिजेत. सध्याची महागाई व फी वाढ ही सरकारच्या या उदात्त हेतूच्या आड येण्याचा संभव आहे. सरकारनेच जनतेच्या मदतीने हा प्रश्न सोडविला पाहिजे. ना.खरे यांच्या विनंतीप्रमाणे विद्यार्थी व शिक्षक,सामाजिक कार्यकर्ते, कारखान्यांचे मालक,देवळे,मशीदयांचे व्यवस्थापक,तुरुंगाचे अधिकारी,सरकारी व आरोग्य वगैरे खाती या सर्वांचे सहकार्य पवित्र व राष्ट्रोध्दारक कार्यास सदैव उत्साहाने मिळत राहिल व आपल्या देशाचा जो मोठा शत्रू अज्ञान त्याचे समूळ उच्चाटन केले जाईल असे' पुढारी' कार ग.गो.जाधव म्हणतात.[१५]

महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक श्वेतपत्रिका --

भारतामध्ये महाराष्ट्र राज्य हे शिक्षणाच्या बाबतीत अग्रेसर आहे. तरीपण महाराष्ट्र राज्यांनी नवीन मसुदा तयार करुन घेतला त्यामध्ये १ ते १० पर्यन्त सर्वांना मोफत शिक्षण विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करणे,योग्य शिक्षकांची निवड करणे,चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे . शिक्षणात सुधारणा व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनांनी शैक्षणिक श्वेतपत्रिका काढली आहे. दि. ११ एप्रिल १९६९ च्या अग्रलेखात' पुढारी' ने शैक्षणिक श्वेतपत्रिकेबाबत खालील मत व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री ना.श्री.मधुकर चौधरी यांनी महाराष्ट्र शासनाच्या श्वेतपत्रिकेचा मसुदा विधानसभा,व विधान परिषद समोर सादर केला. १९६९-७० सालापासून महाराष्ट्रात नवीन शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करता येईल असे मत शिक्षणमंत्र्यांनी व्यक्त केले. अर्थात या श्वेतपत्रिकेमध्ये ज्या गरजा व उदिष्ठेय गृहीत धरली आहेत त्यावरुन महाराष्ट्र शासन कोठारी

कमिशान शिफारशींना डोळे झाकून अवलंब करणार नाही असे दिसते. शासनाने प्रमुख पाच उद्दिष्ट्ये ठेवली आहेत व जनतेचे जीवनमान, गरजा व अकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा घनिष्ठ संबंध निर्माण करणे, शिक्षणविषयक समान संधी ( सर्व क्षेत्रात ) निर्माण करणे, प्राथमिक तसेच १ ते १० इयत्तापर्यन्त शिक्षण सार्वत्रिक व मोफत व्हावे हे अंतिम उद्दिष्ट होते. शैक्षणिक गुणवत्तेची वाढ करणे व ही गुणवत्ता वर्धिष्णु राहिल. या दृष्टीने प्रयत्नशील राहणे. सर्व स्थरातील गुण व उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्याचा विकास साधने ही उद्दिष्ट्ये श्वेतपत्रिकेत होती. आनुषंगिक उपाय योजनाम्हणून शिक्षकांची पात्रता परिक्षा पध्दतीची सुधारणा वगैरे विषयाचा परामर्ष घेण्यात आला आहे. तज्ञ मंडळींनी अगदी बारकाईने विचार करुन आपली प्रतिक्रिया व्यक्त करावी असे 'पुढारी' कारांचे मत आहे.[१६]

शिक्षण संस्थानातील जातीयता --

'पुढारी' कार ग.गो. जाधव यांनी आपल्या दि.८ मार्च १९५१ च्या अग्रलेखात शिक्षण संस्थानातील जातीयता कशी होती याची माहिती दिलेली आहे. शिक्षणक्षेत्रातील जातीभेदातील धोरणाची घोषणा मुंबई सरकारने केली. कोल्हापूरातील वसतिगृहावर व शिक्षण संस्थावरही जाती निरपेक्ष धोरण ठेवण्याची सक्ती करण्यात आलेली आहे. 'बाल विद्यार्थि पाक्षिकां' मध्ये शिक्षण संस्थाचीसंख्या जातीवार खालीलप्रमाणे दिली आहे. हिंदू विद्यार्थ्यांसाठी ४, हरिजन विद्यार्थ्यांसाठी १४, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी १, मराठा विद्यार्थ्यांसाठी ५, भंडारी विद्यार्थ्यांसाठी २, ब्राह्मण विद्यार्थ्यांसाठी २३, जैन विद्यार्थ्यांसाठी १७, विशेष म्हणजे कोणताही जाती धर्म लक्षात घेता मदत देणारी संस्था म्हणून फक्त साताराच्या रयत शिक्षण संस्थेचा एकमेव उल्लेख आहे. जात पाहून शिक्षणासाठी मदत देणाऱ्या संस्थेत ब्राह्मण जातीच्या शिक्षण संस्थाचा उच्चांक सर्वात जास्त आहे. सर्वात कमी आदिवासीची एक्च शिक्षण संस्था आहे. सरकारने सर्वांना समानसंधी, समान हक्क देण्याचे धोरण आहे. जाती धर्मभेदाचे

KOLHAPUR

धोरण न ठेवणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचा इतिहास इतरांच्या पेक्षा वेगळा आहे. शिक्षण क्षेत्रात जातीभेद निर्माण झाल्यास सरकारचे उद्दिष्ट बाजूला राहिल.बाल विद्यार्थ्यांच्या मनावर जातीयतेचा परिणाम होईल.पैसा नसल्यामुळे मागास वर्गाला सरकारची इच्छा असूनही मदत करता येत नाही.यासाठी मागास जातीय धोरणावर उभारलेल्या संस्थावर सरकारने कडक निर्बन्ध घालणे संस्थाचा फायदा मागासलेल्या विद्यार्थ्यांना व्हावा संस्थाने, जहागिरी,इनामे जनहितासाठी नष्ट करणाऱ्या सरकारला शिक्षण संस्थातील ही जातीयता नष्ट करणे अवघड आहे. तरी पण सरकारने कायदे नवीन करुन सुधारणा घडवून आणली असे मत `पुढारी` कारांनी व्यक्त केले आहे.[१७]

कोल्हापूर संस्थानातील काही शिक्षण संस्थानी मोठया प्रमाणात शिक्षण प्रसाराचे कार्य केले,त्यामुळे समाज जागृत झाला.

शहाजी लॉ कॉलेज --

कोल्हापूरचे शहाजी लॉ कॉलेज मुंबई सरकार चालवत होते. मुंबई सरकारने काही दिवसांनी बंद केले पण कोल्हापूरातील निष्ठावंत कार्यकर्त्यांनी व कायदे - तज्ञांनी एकत्र येऊन एका संस्थेच्या प्रवर्तकात प्राचार्य दाभोळकर व प्राचार्य खर्डेकर यांचा समावेश असून सर्वपक्षीय कार्य कर्त्यांचे सहकार्य मिळविण्यात त्यांनी यश मिळविले. `कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशन` ही संस्था बरेच दिवस अगोदर स्थापन झालेली होती,तिचे पुनरुज्जीवन होत आहे. या संस्थेच्या कार्यकारिणीत, सांगली,रत्नागिरीच्या प्रतिनिधिचाही समावेश आहे. विलिनीकरणानंतर शैक्षणिक बाबतीत अनेक संस्थावर अन्याय होत आहेत.त्यात सरकारने नव्या अन्यायाची भर घालू नये म्हणूनच गेली कित्येक वर्षे चाललेली शहाजी लॉ कॉलेजपुढे चालु राहिल व त्याची भरभराट होईल. कोल्हापूरात गेली अनेक वर्षे असणारी कायद्याच्या शिक्षणाची सोय कायमपणे सरकारने चालू ठेवावी असे `पुढारी` कार ग.गो.जाधव यांचे मत आहे.[१८]

श्री.मौनी विद्यापीठाची स्थापना --

'पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी दि.११ एप्रिल १९५२ च्या अग्रलेखात श्री मौनी विद्यापीठाच्या स्थापनेबाबत माहिती दिलेली आहे.कोल्हापूरातील श्री.व्ही.टी.पाटील श्री.जे.पी.नाईक यांचे मार्गदर्शन लाभलेली,आघाडीची प्रगतिप्रिय शिक्षण संस्था प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटी,आचार्य भागवत, श्री.सहस्त्रबुध्दे,श्रीमती सुलभा पाणंदीकर,श्री राम भाऊ पळ्ळेकर,श्री.एस.आर. तावडे, डॉ.चित्रा नाईक ,डी.पी.सी.पाटील ,श्री.नाना धर्माधिकारी इत्यादि शिक्षण तज्ञांच्या नेतृत्वाखाली इंडियन इन्स्टिटयू ऑफ एज्युकेशन,बॉबे व शेठ गोविंदराव कोरगांवकर धर्मादाय संस्था कोल्हापूर या सारख्या संस्थांच्या सहकार्याने एक ग्रामोद्धारक जीवन शिक्षणाचा महान प्रयोग हाती घेत आहे. हा प्रयोग गारगोटीच्या आसमंतात होणार असून तो श्री.मौनी विद्यापीठ या नावाने ओळखला जाणार आहे. या विद्यापीठाच्या अधिपत्याखाली बालमंदिर , प्राथमिक विद्यामंदिर, दुय्यम विद्यामंदिर,अध्यापन विद्यामंदिर,आदर्श शेतमळा, ग्रामनेत्यांचे अभ्यास मंदिर,विशाल ग्रंथ भांडार,संशोधन केन्द्र,समाज शिक्षण केन्द्र,जनता महाविद्यालय,प्रकाशन विभाग इ.विविध संस्था सुरु होणार आहेत. देशाची आजची अत्यंतिक गरज लक्षात घेऊन शेतीसारख्या जीवनव्यापी व्यवसायाच्या पार्श्वभूमीवर गारगोटी,भागास हिऱ्याचे स्वरुप येईल आणि ज्ञानाचे व समृध्दीचे पैलू त्यास पडतील अशी आशा आहे.श्री मौनी विद्यापीठाच्या ग्रामोध्दारक जीवनशिक्षणाच्या या महान प्रयोगासारखा प्रयोग अद्याप भारतात कोठेही झाला नाही तो बहुमान कोल्हापूर जिल्हास मिळाला आहे. विशेषत:श्री.व्ही.टी.पाटील आणि जे.पी.नाईक हे अभिनंदनास पात्र आहेत असे मत वर्तविलेले आहे.[१९]

राजाराम हायस्कूलचा शताब्दी महोत्सव --

'पुढारी' कार ग.गो.जाधव यांनी दि.२९ डिसेंबर १९५४ च्या अग्रलेखात राजाराम हायस्कूलबाबत माहिती दिलेली आहे. देशात विविध क्षेत्रात

अग्रगण्य ठरलेल्या ज्या राजाभियन्स चे शिक्षण कोल्हापूर येथील सुप्रसिध्द राजाराम हायस्कूल येथे झाले.त्या संस्थेचा शतसंवत्सरीक महोत्सव साजरा होत आहे.याचा आनंद संस्थेचे आजी व माजी विद्यार्थी व शिक्षक यांनाच नव्हे तर सर्व करवीर संस्थांना होत आहे. भारताचे उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे या महोत्सवाचे अध्यक्ष आहेत .राजाराम हायस्कूलच्या स्थापनेने १८५१ मध्ये कोल्हापूर संस्थानात इंग्रजी शिक्षणास सुरुवात झाली त्यावेळी या शाळेस संपूर्ण हायस्कूलचे स्वरुप नव्हते.सुरुवातीच्या दोन तीन वर्षात त्यांचे मिडल स्कूल झाले व त्याचे हायस्कूलमध्ये रुपांतर १८६७ मध्ये झाले. इंग्रजी शिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रात विद्वानांची व देशभक्तांची दैदिप्यमान मालिकाच निर्माण झाली व त्या मालिकेतील काही निवडक रत्ने उजळण्याचे श्रेय राजाराम हायकूलला मिळाले.आखिल भारतात ललामभूत ठरलेले न्या.रानडे व ना.गोखले हे कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूल चे विद्यार्थी होत.याचा अभिमान कोल्हापूर नगरीला आहे. शैक्षणिक,सामाजिक,राजकीय,कला,खेळ वगैरे क्षेत्रात अभिमानाने सांगता येतील अशी थोर मंडळी राजाराम हायस्कूलमधून शिकून बाहेर पडली.वेलिंग्टनने नेपोलियनचा पराभव वॉटर्लू येथे केला पण ब्रिटनने ही लढाई हॅरो व इटन येथे जिंकली असे म्हटले जाते.त्याचे सार शिक्षण संस्थेच्या या थोरवीत सामावलेले आहे. म्हणूनच शिक्षण संस्थेला ` अल्मा मटर ` म्हणाजे आई म्हणाता येते. शताब्दीचा सोहळा साजरा होत आहे.हा महोत्सव तीन वर्षापूर्वीच साजरा व्हावयाचा पण डॉ.राधाकृष्णन् पाहुणे लाभावयाचे म्हणूनच की काय तो लांबणीवर पडला असावा.हायस्कूलच्या शताब्दी महोत्सव ग्रंथाचे प्रकाशन गेल्या वर्षी पंतप्रधान श्री.नेहरूंनी कोल्हापूरच्या धावत्या भेटीत केले व आज उपराष्ट्रपतींच्या हस्ते महोत्सवाची सांगता होत आहे.हा खरोखरच अपूर्व योग आहे. न्या.रानडे व ना.गो.खले यांच्या नावांनी पुणीत झालेल्या आणि नेहरू व डॉ.राधाकृष्णन् यांच्या आशिर्वादाने परंपरेन मोलाची भर पडत जाते अशी शुभेच्छा या प्रसंगी व्यक्त केली.[२०]

कर्मवीर भाऊराव पाटील --

सुप्रसिध्द शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते श्री.भाऊराव पायगौंडा पाटील यांना दि.९ मे १९५९ रोजी दुपारी १ वा.पुणे येथे हृदयविकाराचा झटका येऊननिधन झाले.त्यांचे वय ७३ वर्षांचे होते.शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या बहुमोल कार्यामुळे विशेषता ग्रामीण भागातील त्यांच्या कार्यामुळे ते 'कर्मवीर' या नावाने सुपरिचित होते. गेल्या प्रजासत्ताक दिनाच्या पदवीदान भासंभात त्यांना 'पद्मभूषण' ही बहुमानाची पदवी मिळाली. कर्मवीरांना गेल्या महिन्यात पुणे विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लेटर्स ही सन्माननीय पदवी दिली.कै.भाऊराव पाटील हे साता-याच्या रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक असून या संस्थेतर्फे महाराष्ट्रात कित्येक शाळा व कॉलेजेस चालविली जात आहेत. या शिक्षण कार्याची स्फूर्ती त्यांनी म.फुले व राजर्षि शाहू महाराज यांच्यापासून घेतली होती. पुण्याचे सिव्हिल सर्जन डॉ.सी.एल.मोदी यांनी सांगितले की,भाऊराव पाटील यांना हृदय विकाराचा झटका आला.त्यांच्यावर उत्तम उपचार करण्यात आले पण त्याचा उपयोग न होता थोड्या वेळात त्याचे निधन झाले. लोकांनी मोठया संख्येने इस्पितळात येऊन कै.भाऊराव पाटील यांचे अंत्यदर्शन घेतले आणि त्यांना श्रध्दांजली वाहिली.त्यात महर्षी धोंडो केशव कर्वे, प्रा.धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव घाटे,बाबुराव जेधे,जिल्हाधिकारी श्री.एस.बी.कुलकर्णी इ.प्रमुख मंडळी होती.[२१]

दि.९ मे १९५९ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन झाले. निधनानंतर 'पुढारी' कार ग.गो. जाधव यांनी मृत्युलेख दि.१२ मे १९५९ रोजी लिहिला,आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शनिवार दि.९ मे १९५९ रोजी निधन झाले. याबद्दल सर्वांना अत्यंत दु:ख होत आहे. भाऊराव पाटील यांनी आपला देह आणि सर्वस्व हात मागासलेल्या हरिजन आणि बहुजन समाज यांच्यात शिक्षण प्रसार करण्यात खर्ची घातला.ही प्रेरणा त्यांना म.फुले व राजर्षि शाहू महाराज यांच्या शिकवणुकीतून व कार्यातून मिळाली.समाजात जातिभेदामुळे

निर्माण झालेल्या विषमतेवर या दोघांनी हल्ला चढविला व ही विषमता नष्ट करण्याचे साधन म्हणून शिक्षण प्रसारास चालना दिली. विद्यामंदिराची दारे सर्वांना खुली असली तरी जातिभेदातून निर्माण झालेल्या आर्थिक विषमते-मुळे सर्वांना त्याचा फायदा घेता येत नव्हता. म्हणून मागासलेल्या व दरिद्री समाजांना अल्प खर्चात सर्व प्रकारचे शिक्षण संपादन करणे सुलभ व्हावे म्हणून राजर्षि शाहू महाराजांनी कोल्हापूरात सर्व जातीच्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे स्थापन केली आणि त्या समाजातील हुषार व होतकरु विद्यार्थ्यांना हाताशी धरुन त्यांना उत्तेजन दिले. कर्मवीर राजर्षिंच्या सान्निध्यात वाढले आणि त्यांच्या विचाराचा व कार्याचा तरुण व उत्साही कर्मवीरांच्या मनावर मोठा प्रभाव पडला. राजर्षिंच्यानंतर कर्मवीरांनी सातारा हे आपले कार्यक्षेत्र बनविले. आणि तेथे राजर्षिंच्या नावाने शाहू छत्रपति विद्यार्थी वसतिगृह ही संस्था स्थापन केली. मागासलेल्या समाजाला कांही सवलती देऊनही त्याचा फायदा घेण्यासारखी सर्वांचीच परिस्थिति नाही याची अनुभवाने त्यांना जाणिव झाल्यामुळे स्वावलंबी शिक्षणाचा प्रयोग त्यानी सुरु केला व तो यशस्वी करुन दाखविला. इतकेच नव्हे तर प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षणाच्या संस्था गरजेच्या मानाने उपलब्ध नाहीत म्हणून त्यानी आपला प्रसार वाढविला. आणि अनेक संस्था स्थापन केल्या. त्यामुळे मुळच्या संस्थेचा पसारा आज इतका वाढला आहे किंबहुना कर्मवीरांनी आपल्या धाडसी स्वभावाने वाढविला आहे की तो यापुढे कोण सांभाळणार अशी शंका सर्वांना वाटत आहे. हा पसारा वाढवताना त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले पण त्यानीच ते प्रसंग निभावून नेले. आण्णांच्या बोलण्यात बहुजन समाजाचे शिक्षण याशिवाय दुसरा कोणताही विषय नसे. प्री-डिग्री कोर्सचा बहुजनसमाजातील विद्यार्थ्यांवर होणार परिणाम त्यानी घोषित केलेली म.गांधी युनिव्हर्सिटी व ना.यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेली शिवाजी युनिव्हर्सिटीची कल्पना, नाव काही असो, ती कुठेही निघो पण अशी युनिव्हर्सिटी निघणे बहुजन समाजाच्या दृष्टीने किती आवश्यक आहे ते पुढारीकारांशी बोलले, तीच त्यांची व पुढारीकारांची शेवटची भेट

होती. कर्मवीरांनी केलेले कार्य जाणून भारत सरकारने त्यांना दिलेली पद्मभूषण व पुणे विद्यापीठाने दिलेली डी.लिट.ही पदवी म्हणजे सरकारने आणि जनतेने त्यांच्या कार्याबद्दल व्यक्त केलेली पोच पावतीच होय. आण्णाच्या कार्याचे स्वरुप लक्षात घेतले तर त्यांना कर्मवीर या ऐवजी ' विद्यायोगी ' हीच पदवी देणे वाजवी होईल असे ' पुढारी ' कार ग.गो.जाधव यांना वाटते.[२२]

शिवाजी विद्यापीठाचीस्थापना --

कोल्हापूरला एखादे विद्यापीठ स्थापन करावे असे अनेकांना वाटत होते. असा ब-याच वेळा प्रयत्न केलेला होता. जे विद्यापीठ होईल त्या विद्यापीठास महापुरुषाचे नाव द्यावे अशी कल्पना पुढे आली. त्या महापुरुषाचा येथील जनतेशी संबंध असावा, यातूनच त्या महापुरुषाचे नाव ज्या महापुरुषाचे नाव सुचले त्या विद्यापीठास शिवाजी महाराजांचे नाव देण्याचे एकमताने ठरले. हे विद्यापीठ थोड्याच दिवसात नावाला आले. विद्यापीठ कोल्हापूरला होण्यासाठी येथील जनतेने खूप परिश्रम केले होते त्याच्या या कार्याला यश मिळाले.

' पुढारी ' कार ग.गो. जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ कल्पनेचा पूर्वइतिहास व स्थापनेची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे सांगितली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांनी दक्षिण महाराष्ट्राची ' शिवाजी विद्यापीठ ' तिस-या पंचवार्षिक योजनेमध्ये कोल्हापूरात स्थापन करण्याची अत्यंत महत्वपूर्ण घोषणा केली. तीस वर्षापासून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात राजकारणाने रेंगाळलेला हा वाद कायमचा मिटविला. याबाबत महाराष्ट्र शासनाला धन्यवाद देणे जरुरीचे आहे. मुंबई विद्यापीठ महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व यथायोग्य रीतीने करू शकत नाही. तेव्हा महाराष्ट्राचे स्वतंत्र विद्यापीठ पुण्यात प्रस्थापित करण्यात यावे,याबाबत तेथील जनतेने प्रयत्न केला पण महाराष्ट्रातील लोकमत अनुकूल नसल्याने त्याचे प्रयत्न वाया गेले. कै.मुकुंदराव जयकर यांच्या नेतृत्वाखाली पुणे विद्यापीठ अस्तित्वात आले. पुणे विद्यापीठाची स्थापना झाली असली तरी महाराष्ट्र विद्यापीठाची गरज दिवसेंदिवस वाढत गेली.

कारण मुंबई विद्यापीठाप्रमाणेच पुणे विद्यापीठामुळे महाराष्ट्रीयन जनतेच्या याबाबतच्या भावनेचा उपशम होऊ शकत नाही. विद्यापीठ कोल्हापूरात स्थापन करण्यात यावे यापूर्वीच्या मागणीस जास्त चालना मिळाली. यादृष्टीने कोल्हापूरातून एक शिष्टमंडळ मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांना भेटले. या शिष्टमंडळात डॉ. पी. सी. पाटील, प्रिन्सिपॉल बाळासाहेब खर्डेकर, ताराराणी आणि मौनी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष श्री. व्ही. टी. पाटील आणि श्री. शं. गो. दामोळकर यांचा समावेश होता. ना. यशवंतराव चव्हाण यांनी या शिष्टमंडळाचे म्हणणे अगत्यपूर्व ऐकून घेतले आणि असे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी लोकसंख्येची असलेली अट पुरी झाल्यानंतर या मागणीचा योग्य विचार केला जाईल असे आश्वासन दिले. ना. मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले होते आश्वासन या शिष्टमंडळांनी पूर्ण केले. 'पुढारी' कारांना कृतार्थतेचे समाधान वाटणे साहजीक आहे कारण संपादकीयत्वाखाली येथे पूर्वी प्रसिध्द होत असलेल्या 'सेवक' या साप्ताहिक नियतकालिकामध्ये राजाराम कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल कै. डॉ. बाळकृष्ण यांनी १९३३ साली स्वतंत्र लेख लिहून 'शिवाजी विद्यापीठाच्या' कल्पनेस मूर्त स्वरुप दिले आहे. याविषयी डॉक्टरसाहेबांशी 'पुढारी' कारांची अनेकदा चर्चा झाली. ही कल्पना डॉ. बाळकृष्णांना शिवाजी विद्यापीठाची कल्पना छ. शिवाजी महाराजांच्या चरित्राचे संशोधन करीत असताना आली. या नंतरच्या काही घटनामुळे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाची कल्पना आकारास येऊ शकली नाही. मध्यंतरी या योजनेस विशेष चालना मिळाली नाही. याला अनेक कारणे आहेत. यासंबंधीच्या लोकभावना हळुहळू तीव्र होत गेल्या हे निदर्शनास आले. यासंबंधी अलीकडे जे प्रयत्न झाले ते सर्वविश्रुत आहेत. 'पुढारी' कारांनी वेळोवेळी संपादकीय मजकुरातून याची सांगोपांग चर्चा केली आहे. विशेषत: आमदार श्री. बी. जी. साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या १९६० च्या अंदाजपत्रकी अधिवेशनमध्ये दि. १५ जुलै रोजी केलेल्या भाषणात कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचा इतिहास निवेदन केला आणि यासंबंधी निर्णय घेण्यासाठी याच अधिवेशनामध्ये

कमिशन नेमल्याची घोषणा करावी अशी मागणी केली. आणखी कांही प्रासंगिक समारंभामध्ये मुख्यमंत्र्यापुढे त्यांनी ही मागणी पुन्हा मांडली. या सर्वांचे प्रयत्न मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या घोषणेने सार्थकी लागले. अशा प्रकारे शिवाजी विद्यापीठाचा पूर्व इतिहास 'पुढारी' कारांनी आपल्या अग्रलेखात सांगितला आहे. याविषयी माहिती आपणास वरीलप्रमाणे पहावयास मिळते.[२३]

शिवाजी विद्यापीठ कार्यालय प्रारंभ --

कोल्हापूर दि. १८ नोव्हेंबर १९६२ विजयादशमीच्या मंगलदिनी दुपारी १२.४५ वा. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयास प्रारंभ करण्यात आला. तसेच शिवाजी विद्यापीठाचा नामफलकही विद्यापीठाच्या कार्यालयासमोर उभारण्यात आला, सुरुवातीला शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब गणपतराव पवार यांनी औपचारिक, विधिपूर्वक पूजन करुन त्यांनी शिवप्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे कार्यवाहक डॉ. बी. आर. ढेकणे यांनी सरस्वती, गणपती व शिवाजी यांच्या प्रतिमांना अक्षाता व फुले वाहिली व इतर सर्व उपस्थित नगराध्यक्ष श्री पोपटराव जगदाळे, खासदार श्री व्ही. टी. पाटील, श्री. ग. गो. जाधव ( संपादक पुढारी ) सर्वश्री पी. बी. साळुंखे, ॲड. बाबुराव जोशी, कर्मवीर भिसे, धारवाडकर, अनंतराव कटकोळ, निपाणी, शंकरराव नलावडे उपाध्यक्ष, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, कोल्हापूर, आर. वाय. शिंदे, म्युनिसिपल चीफ ऑफिसर, गणपतराव वडणगेकर, आर्टिस्ट, शंकरराव घोरपडे, आर्टिस्ट, डी. एस. चव्हाण, माधवराव राऊत, चव्हाण म्युनि. इंजिनिअर, डॉ. बी. एल. कोतमिरे, बेळगांव, सौ. पवार व सौ. ढेकणे इ. शिक्षणप्रेमी नागरिक स्त्री-पुरुष विद्यापीठ व विद्यापीठाचा नोकरवर्ग उपस्थित होता. वरील कार्यक्रम कार्यालयासाठी तूर्त भाड्याने घेण्यात आलेल्या महागांवकर बंगल्यात करण्यात आला. ( कावळा नाक्या नजीक ) सध्या चालू असलेल्या ओपल हॉटेल हा तो बंगला होता. शिवाजी विद्यापीठ कार्यालयाच्या प्रारंभानिमित्त सायंकाळी

४ ते ८ पर्यन्त निमंत्रितासाठी पानसुपारीचा कार्यक्रम ठेवला होता. परंतु महाराष्ट्राचे राज्यपाल व शिवाजी विद्यापीठाचे कुलपति डॉ.सुबरायन यांच्या दु:खत निधनामुळे हा पानसुपारीचा कार्यक्रम रद्द करण्यात आला व त्या ऐवजी केवळ सदर कार्यालयाच्या प्रारंभाचा औपचारिक व साधा कार्यक्रम दुपारी १२-४५ वा.उकरण्यात आला होता.

उद्घाटनासाठी राष्ट्रपती --

शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सहावे विद्यापीठ असून त्याचा महोत्सवी उद्घाटन समारंभ राष्ट्रपतीच्या हस्ते होणार होता.[२४]

शिवाजी विद्यापीठ स्थापनेत पुढारीचा वाटा --

शिवाजी विद्यापीठाची स्थापना १८ नोव्हेंबर १९६२ या दिवशी झाली. आणि पंचगंगेला ज्ञानगंगा मिळाली असा तो अमृताने न्हालेला सोनियाचा दिवस । याचे नवल 'पुढारी' काराना असणार नाही, तर कुणास असणार ? त्यांच्या साक्षीने आणि प्रयत्नांनी विद्यापीठाचा प्रारंभ झाला. पुणे विद्यापीठानंतर कोल्हापूरला विद्यापीठ व्हावे ही सर्वांचीच इच्छा । पुढारीकारांची लेखणी आणि वाणी त्यासाठी सतत प्रयत्नशील राहिली.किंबहुना ते स्वाभाविक होते कै.ग.गो. जाधव यांच्या ऋणाची जाणिव विद्यापीठाला होती.त्यांना दिलेली 'डी.लिट.ही कृतज्ञतेची केवळ पोचपावती होती. ऋणाची फेड होणार नव्हती त्या ऋणातच राहणे हा एक आनंद होता व तो विद्यापीठाला आस्वादण्यास मिळाला. बहुजन समाजाच्या सोईसाठी येथे विद्यापीठ व्हावे, ही 'पुढारी' ची पहिल्यापासून भूमिका होती. विशिष्ट सामाजिक गटाच्या मक्तेदारी विरुध्द ती भूमिका नव्हती,तर शिक्षणाचे सामुहिकरण होण्याची ती तळमळीची मागणी होती. महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा या भूमिकेचा तितक्याच निखळपणे उल्लेख केला गेला पाहिजे.एक जिल्हा वृत्तपत्र म्हणून जन्माला आलेल्या वृत्तपत्राची ताकद कशी उभी राहते व चमत्कार घडविते याचे हे तेजस्वी उदाहरण आहे.

जनमानसाची स्पंदने --

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण दिल्लीला संरक्षण मंत्री म्हणून गेले. तेच साल शिवाजी विद्यापीठाचे जन्मवर्ष होय. यशवंतरावजी म्हणाले होते की दिल्लीला जाण्यासाठी महाराष्ट्र सोडण्यापूर्वी मी आवर्जुन एक काम हाता वेगळे केले ते म्हणजे शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेचा ठराव होय या महान घटनेमागे जनमानसाची शक्ती उभी करण्याची प्रक्रिया पुढारी मधून चालू होती. प्राचार्य बाबासाहेब तावडे शिवाजी विद्यापीठाच्या घटना समिती अध्यक्ष होते. अवघ्या ३।४ महिन्यात घटना तयार करण्याचे अवघड काम करावयाचे होते, त्यावेळी कोल्हापूरातील अनेक अनुभवी विद्वानांसह पुढारी चे संपादक व पुढारीचा परिवार प्राचार्य तावडे यांना सहकार्य करण्यास पुढे आला होता. एक सामाजिक कार्य म्हणून सर्व मंडळी एकदिलाने एकत्र आली हे कोल्हापूरचे भाग्य होय. सामाजिक गरज म्हणून पुढारी ने पाठपुरावा केल्यावरही जर समाजाचा पाठींबा व सहकार्य यांचे दर्शन घडले, नसते तर पुढारी अपूरा ठरला असता. या वृत्तपत्राला समाजाची नाडी कळली नाही असे सिध्द झाले असते. परंतु शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेच्या घटनेतून हीच गोष्ट पुन्हा सिध्द झाली, हे वृत्तपत्र म्हणजे जनमानसाची स्पंदने होत . वर्तमानपत्र केवळ आवाज उठवणारे असून चालत नाही तर समाजाला विचार देणारे, समाज प्रक्रियेला वळण देणारे असावे लागते.

करवीर जनतेच्या भावजीवनातील एक उपेक्षित दालन पुढारीच्या माध्यमातून संपन्न झाले. एक नवे सोनेरी पान लिहिले गेले. पुढारी आणि शिवाजी विद्यापीठ यांचा विधायक स्नेहाचे एक सुंदर प्रतीक निर्माण झाले. सन १९६२ च्या शिवाजी विद्यापीठ स्थापना वर्षापासून पुढारी आणि विद्यापीठाची संगत फुलत गेली. प्रत्येक चांगल्या उपक्रमात आणि विद्यापीठाच्या २६ वर्षांच्या इतिहासात पुढारी कडून प्रत्येक वळणावर सर्व चढतारांच्या

प्रसंगात शिवाजी विद्यापीठाला साथ मिळालेली आहे. वृत्तपत्र इतिहासात हा वस्तुपाठ एक आदर्श उदाहरण म्हणून सतत उल्लेखिला जाईल यात शंका बाळगण्याचे कारण नाही. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासात हा खास आदर्श आहे.[२५]

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

संदर्भ


१ दै.पुढारी कोल्हापूर - ता.२२ मार्च १९५३,पान नं.२

२ ,, - ता.११ जानेवारी,१९४७,पान नं.३

३ ,, - ता.१८ एप्रिल १९४७,पान नं.२

४ ,, - ता.२५ जानेवारी,१९४९,पान नं.२

५ बाबा आढाव - सामुदायिक पुढारी पण सं.डॉ.एस.एस.भोसले, 'पुढारी'कार ग.गो. जाधव गौरव ग्रंथ १९८२,पृ.क्र.२०८.प्रका.कोल्हापूर

६ दै.पुढारी ,कोल्हापूर - ता.१४ ऑगस्ट १९४९,पान नं.२

७ प्रा.कुंभार भैरव (सं.) आधुनिक महाराष्ट्राच्या प्रबोधनाची वाटचाल 'पुढारी' कार ग.गो.जाधव यांचे निवडक अग्रलेख,संपा.पृ.क्र. १३,१४.

८ दै.पुढारी,कोल्हापूर - ता.४ नोव्हेंबर,१९६८,पान नं.२

९ ,, - ता.२२ एप्रिल १९४५,पान नं.२

१० ,, - ता.३० ऑक्टोबर १९५४,पान नं.२

११ ,, - ता.६ जून १९५७,पान नं.२

१२ ,, - ता.२६ मार्च १९५४,पान नं.२

१३ ,, - ता.८ मे १९५३, पान नं.२

१४ ,, - ता.१७ एप्रिल १९५९,पान नं.२

१५ ,, - ता.६ ऑगस्ट १९४९,पान नं.२

१६ ,, - ता.११ एप्रिल १९६९,पान नं.२

१७ ,, - ता.८ मार्च १९५१, पान नं.२

१८ ,, - ता.१० मार्च १९५१, पान नं.२

१९ ,, - ता.११ एप्रिल १९५२, पान नं.२

२० ,, - ता.२९ डिसेंबर १९५४, पान नं.२

२१ ,, - ता.१० मे १९५९,पान नं.१

२२ ,, - ता.१२ मे १९५९, पान नं.२

| | | |
|---|---|---|
| २३ | दै.पुढारी ,कोल्हापूर | - ता.२४ जून १९६१, पान नं.२ |
| २४ | ,, | - ता.१० ऑक्टोबर १९६२,पान नं.१ |
| २५ | ,, | - सुवर्ण महोत्सव विशेषांक,ता.२२ जून १९८९, पुरवणी पान नं.९. |